सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्राथमिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.४८...ठ. क्र...१०६
दि. 31/5/2016 ...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
एकमताने/बहुमताने पास झाला.



UIDSSMTयोजनेकरीता १३व्या वित्त आयोग अनुदान मधून मनपा हिस्सा म्हणून भरलेली रक्क्म पैकी शिल्लक असलेली रक्कम महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) व विशेष अनुदान योजनेकरीता वर्ग करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव UIDSSMT करीता भरलेल्या रुपये २४.००कोटी रक्कमेतून शिल्लक रक्कम व त्यावरील व्याज याप्रमाणे एकूण र.रुपये १७,७३,२५,०००/- इतकी रक्कम १)महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) मलनित्सारण करीता र.रु.१७,२१,९६,३२१/-२)मुलभूत सोयीसुविधा पुरविणे विशेष अनुदान रु.९.३५कोटी करीता र.रु.५१,२८,६७९/- याप्रमाणे वर्ग करुन रक्कम जमा करण्यांत आल्यानंतर र.रु.१८,७०,००,०००/-ची कामे मार्गी लागतील.सबब प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सदरची बाब आर्थिक बाबीशी निगडीत असल्याने.मा.म.न.पा.सभेपुढे सादर करणेस,मा.आयुक्त यांचे दिनांक ७/५/१६चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/कायमी/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.क्र. ४६ ठ. क्र. १०८ दि. ३१/७/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



शहरातील ठिक-ठिकाणच्या पर्जन्य जलवाहिनींच्या सुधारणा करणे बाबत (फेज-१,२ व ३) महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कार्यक्षेत्रात नागरी पायाभूत व सामाजिक सुविधा तयार करणे व त्यांच्या बळकटीकरणाकरीता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर)अभियान राबविणे बाबत मा.शासन निर्णय पारित करणेत आलेला आहे.सदर शासन निर्णयातील पृ.क्र.३ मधील नमूद ड मधील अ.क्र.४ मध्ये नमूद असले प्रमाणे पर्जन्य जलवाहिनी करीता प्रसताव तयार करुन तो शासनास मंजूरीस्तव सादर करणे आवश्यक आहे.सदर योजनेचे वित्तीय आकृतिबंध ड वर्ग महानगरपालिकेकरीता राज्य शासन ७०% व मनपा हिस्सा ३०% असा राहील.सबब प्रस्तावात नमूद बाबी पाहता पर्जन्य जलवाहिनीकरीता रुपये १०० कोटीच्या आंत फेजावाईज प्रस्ताव सादर करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.त्याअनुषंगाने प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे.प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाकरीता पूर्वगणपत्रक क्र.०७ ते २१ (फेज-१),पूर्वगणपत्रक क्र.२२ ते ४४ (फेज-२),पूर्वगणपत्रक क्र.४५ ते ५७ (फेज-३) सन २०१६-१७ एकूण र.रु.२१६.० कोटी एवढया रक्कमेस व प्राधान्यक्रम निश्चित करणेस तसेच ३०% मनपा हिस्सा बजेट तरतूद करणेस मा.म.न.पा.सभेची सक्षम मान्यता मिळणेस्तव मा.आयुक्त यांचे दिनांक ११/५/१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

शहरातील ठिक-ठिकाणच्या पर्जन्य जलवाहिनी खालील नमूद तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | नाला क्र. | कामाचे नांव |
|---|---|---|
| १. | २ | जुना पुना नाका ते १४ कमान ब्रिज येथे रेल्वे |
| २. | ७ | एन एच १३ लगत नम्रता हौसिंग सोसायटी विजापूर रोड ते सिध्देश्वर वनविहार प्रताप नगर रोड |
| ३. | १२ | निलम नगर ते शांती नगर येथे नाला करणे |
| ४. | १३ | सोमय्या नगर ते स्वागत नगर ते देसाई नगर सिडीवर्क व पावसाळी गटार करणे |
| ५. | २८ | सिध्दार्थ नगर नाला करणे |
| ६. | २९ | महालक्ष्मी नगर नाला |
| ७. | ३० | गणेश नगर नाला |
| ८. | ३१ | किरण नगर नाला |
| ९. | ३७ | ७० फूट रोड ते सत्यसाईबाबा नगरचा कोपरा ते सो.म.पा.शाळा क्र. ५ ते एस.टी.स्टॅन्ड क्र. २ आणि लेप्रसी वसाहतचा कोपरा ते सो.म.पा.शाळा क्र. ५ |
| १०. | ३९ | रेल्वे स्टेशन ते मंगळवेढा रोड ते १४ कमान नाला |
| ११. | ४३ | सुनिल नगर ते कामगार वसाहत ते कलावती नगर ते आशा नगर ते विटकर कारखानाचा मागील भाग ते कल्लप्पा नगर ते नवले नगर ते नेताजी शाळा |
| १२. | १ | मुलतानी बेकरी जवळील होटगी रोड क्रॉसिंग ते पश्चिम मध्य रेल्वे लाईनच्या मोरीपर्यंत (कल्व्हर्ट) |
| १३. | ३ | उमानगरी मुरारजी पेठ (श्री. शरदचंद्रजी पवार प्रशाला ते वसंत विहार ते जुना पुणा नाका) |
| १४. | ४ | एमआयडीसी वज्रेश्वरी नगर ते अक्कलकोट रोड (भाग-१) |
| १५. | ५ | एमआयडीसी वज्रेश्वरी नगर ते अक्कलकोट रोड ते सोनिया नगर (भाग-२) |
| १६. | ६ | केकडे नगर ते संभाजी शाळा ते इंदिरा नगर (विडी घरकूल परिसर) |
| १७. | ८ | हनुमान खड्डा (भगवान नगर नाला) |
| १८. | ९ | मडकीवस्ती ते बालाजी नगर |
| १९. | १० | जुना कुमठा नाका ते अंत्रोळीकर नगर |
| २०. | ११ | लिमयेवाडी ते चमडा कारखाना ते पटवर्धन चाळ भागातील नाला |

...२

| | | |
|---|---|---|
| २१. | १४ | विजय नगर ते दिक्षित नगर ते शोभा नगर |
| ० | ० | ब्रम्हदेव नगर, आंबेडकर नगर, येथील मुलतानी बेकरीच्या वरील भागातील नाला |
| २२ | १५ | संतोष नगर, पाटील नगर, स्मशानभूमी आणि जुना पुणा नाका |
| २३. | १६ | हनुमान नगर नाला |
| २४. | १७ | मसरे वस्ती नाला |
| २५. | १८ | कलंत्री चौक ते अक्कलकोट रोड |
| २६. | १९ | अक्कलकोट रोड ते पोगूल विहार |
| २७. | २० | पोगूल विहार ते हैद्राबाद रोड |
| २८. | २१ | हैद्राबाद रोड ते आदर्श नगर |
| २९. | २२ | आदर्श नगर ते शेळगी नाला |
| ३०. | २३ | शेळगी नाला ते तुळजापूर रोड स्मशानभूमी |
| ३१. | | निलपेठ नाला ते शेटे वस्ती शेटे नगर, टेळे नगर, राजेश कोठे नगर, दिक्षीत नगर, सोनी नगर पासून शेळगी नाला पर्यंत नाला बांधणे तरतूद र.रु. १.५० लाख |
| ३२. | २४ | तुळजापूर रोड स्मशानभूमी ते जुना पुणा नाका |
| ३३. | २५ | अक्कलकोट रोड ते पद्मशाली स्मशानभूमी ते हैद्राबाद रोड ते रिंगरोड ते रघोजी ट्रॅान्सपोर्ट ते शेळगी नाला |
| ३४. | २६ | मित्र नगर शेळगी नाला |
| ३५. | २७ | चंडक प्रशाला भागातील नाला |
| ३६. | ३२ | गोणे नगर ते ताई चौक नाला |
| ३७. | ३३ | अळगीकर अड्डा ते विजय नगर नाला |
| ३८. | ३४ | आरती नगर ते जमादार वस्ती ते नक्का वस्ती नाला |
| ३९. | ३५ | विजयालक्ष्मी नगर नाला |
| ४०. | ३६ | जयहिंद चौक ते एस.पी.एम.कॉलेज कुमठे गांव |
| ४१. | ३८ | विश्रांती चौक ते रिंगरोडचा आतील भाग ते राष्ट्रीय महामार्ग (रुपाभवानी मंदिर मार्ग) |
| ४२. | ४० | कंबर तलाव ते महात्मा गांधी प्राणीसंग्रहालय ते वळसंगकर हास्पीटलचा मागील भाग ते रामवाडी भागाकडील नाला |
| ४३. | ४१ | सुनील नगर ते संगमेश्वर नगर ते अक्कलकोट रोड येथील मुतकिरी कारखाना |
| ४४. | ४२ | अभिषेक नगर ते राजीव नगर ते पोगूल विहार नाला |
| ४५. | ४४ | आम्रपाली चौक ते विश्रांती चौक |
| ४६. | ४५ | शास्त्री नगर ते रेल्वे स्टेशन |
| ४७. | ४६ | शिवाजी नगर येथील नाला (भाग-१) |
| ४८. | ४७ | कचरा डेपो जवळील शेळगी हिप्परगा नाला |
| ४९. | ४८ | १४ कमान नाला ते देगांव |
| ५०. | ४९ | बसवेश्वर नगर नाला |
| ५१. | ५० | निराळे वस्ती ते रेल्वे ट्रॅक ते १४ कमान नाला |

याकामी सन २०१६-१७ चे भांडवली कामातील खर्चाच्या तक्त्यात नमूद केलेप्रमाणे ड्रेनेज लाईन घालणे व गटारी बांधणे यातून ३ कोटी व नाला ट्रेनिंग करणे, नाला उंची वाढविणे यातून २ कोटीची तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला/सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~ सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४८ ठ. क्र. १०९ दि. ३१/५/१६ रोजी ठेवला त्यावरील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



केंद्र शासन पुरस्कत अमृत अभियानाच्या अनुषंगाने सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यांत आलेल्या ग्रीन स्पेस डेव्हलपमेंट प्रकल्पाच्या अनुषंगाने सुधारित पुर्वगणपत्रकाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव १ ते ६ उद्यानाकरीता यापूर्वी र.रु.१०७.६२ लाखाचा पूर्वगणपत्रक तयार करण्यांत आलेला असून,परंतु प्रस्तावात नमूद बाबींचा विचार करता, पुनश्चः सुधारीत प्रकल्प प्रस्ताव तयार करणेचे आदेश प्राप्त झालेने शासनाच्या प्राप्त मार्गदर्शक सूचनेनुसार प्रस्तावातील तक्त्यात नमूद प्रमाणे अ.क्र.१ ते ६ उद्यानांकरीता र.रु.१,१५,१५,०१५/-इतक्या रक्कमेच्या पूर्वगणपत्रकास व उपरोक्त नमूद प्रमाणे मनपा निधीतून र.रु.४०,१५,४०५/-इतक्या रक्कमेची तरतूद करणेस मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळणेंस्तव मा.आयुक्त यांचे दि.११/५/१६चे टिपणीने आलेल्या प्रकरणास मान्यता देण्यात येत आहे.

याकामी सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यामधील अ.क्र. २ शहरातील बागांचे सुशोभिकरण करणे, सुधारणा करणे व नविन बाग करणे या सदरातून तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत पूर्ण झालेल्या बागा व अमृत योजनेतील उद्याने सोडून राहिलेली उर्वरीत उद्याने विकसित करण्याकरिता अमृत योजना २०१६-१७ योजनेअंतर्गत प्राधान्यक्रम निश्चित करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत अर्धवट झालेल्या बागा विकसित करणेस व हद्दवाढ भागामध्ये ज्या ठिकाणी बागांचे आरक्षण असेल त्या ठिकाणी उद्याने व थीम पार्क सन २०१६-१७ व त्यापुढील आर्थिक वर्षात आराखडा तयार करुन मंजूरीस्तव शासनाकडे सादर करणेस व त्याप्रमाणे विकसीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/खास/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.४० ठ. क्र. ११० दि. ३/६/१६ रोजी ठेवता झालेला प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मा. महाराष्ट्र शासन मुंबई यांचे सन २०१६-१७ चे अर्थसंकल्पामध्ये महाराष्ट्रातील महिलांकरिता दि. १८-३-२०१६ रोजी झालेल्या चर्चेदरम्यान महाराष्ट्राचे अर्थमंत्र्यांनी महिलांकरिता तेजस्विनी योजना राबविणेत येणार असून, सदर योजनेमध्ये महाराष्ट्रातील मुंबई, नवी मुंबई, पुणे, कल्याण डोंबिवली या शहरामध्ये प्रायोगिक तत्वावर स्वतंत्र बस योजना राबविण्याचे जाहिर केले आहे. सदर योजनेकरिता महाराष्ट्र शासनाने रक्कम रु. ५० कोटी रुपयाची तरतूद सूचविलेली आहे.

आजला सोलापूर शहर हे देशातील स्मार्ट सिटीमध्ये समाविष्ठ झाले असल्याने उपरोक्त योजना ही सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाने ग्रामीण व शहरी महिलांकरिता राबविणे इष्ट होईल. तसेच आजला सोलापूर शहरामध्ये ७० ते ८० हजार महिला विडी कामगार असून त्यांनादेखील सदर योजनेचा लाभ देणे शक्य आहे. त्याकरिता सदर योजनेमध्ये सोलापूर शहराचा समाविष्ठ होणेकरिता ही सभा मान्यता देत असून, सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभा, सोलापूर महानगरपालिका यांचे मान्यतेअंती मा. महाराष्ट्र शासन यांचेकडे शिफारस करुन सदर योजनेमध्ये समाविष्ठ करणेसही मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्ताव प्रकरणी मा. परिवहन समिती ठराव क्र. ०३, दिनांक ३०-४-१६ चे शिफारसीने आलेले प्रकरणास मा. महाराष्ट्र शासनाकडे शिफारस करणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/खास/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४१ ठ. क्रं. १११ दि. ३/६/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेसमधून शहर व जिल्हयातील बातमी संकलित करुन ते प्रसारित करणेस्तव पत्रकारांना शहर हद्दीत व शहर हद्दीबाहेर प्रवास करावे लागत असल्याने त्यांनी त्यांचे संघटनेतर्फे मोफत बस प्रवास पास मिळणेबाबत मागणी केलेले आहे. सदर मागणीचा विचार करता पत्रकारांना सामाजिक कार्यासाठी मोफत बसप्रवास पास देणेबाबत त्यांनी केलेली मागणी योग्य असून सदर बस प्रवासापोटी मा.म.न.पा.कडून विशेष अनुदान मिळाल्यास सदर पत्रकारांना मोफत बस प्रवास देणेस ही सभा मान्यता देणेत येत आहे. तरी मा.म.न.पा.कडून अनुदान मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभा, सो.म.पा. यांचेकडे सादर करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाबाबत मान्यता मिळणेस्तव मा.म.न.पा.सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेस्तव मा.परिवहन समिती ठ.क्र.१३,दि.१२/५/१६चे शिफारशीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

मा.महाराष्ट्र शासनाच्या निकषानुसार अधिकृत पत्रकारांना मोफत बस प्रवास देणेस मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/आमुलो/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४२ ठ. क्र. ११२
दि. ३१/६/१६ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

विजापूर रोड येथील अत्तार नगर मधील प्रमुख डी पी रस्ता डांबरीकरण करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. ५३/२०१५-१६ र.रु. २१,५७,९५७/- यांस व सदरकामी येणारा खर्च सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील भांडवली कामे अंतर्गत रस्ते बांधणे या सदरातून करणेकामी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. ७-५-१६ चे टिपणीने आलेले प्रकरणांस मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~सामुली~~/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४२ ठ. क्र. ११३ दि. ३।६।१६ रोजी ठेवता सालोल प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील हुतात्मा स्मारकाचे नुतनीकरण करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद वस्तुस्थितीप्रमाणे एन्व्हायरोसेफ कन्सल्टंट यांनी सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील मार्कंडेय उद्यान येथील एकमेव हुतात्मा स्मारकाचे पूर्वगणनपत्रक क्र. २/सन २०१६-१७ र.रु. ६३,१०,९२८/- इतकेचे तयार केले असून, त्यास मा.मनपा सभेची सक्षम मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २१-४-१६ चे टिपणीने आलेले प्रकरणास मान्यता देणेत येत असून, तसेच सोलापूर शहरातील चार हुतात्मा पुतळा व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुतळा आणि महात्मा बसवेश्वर पुतळा व परिसर नुतनीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ४४ ठ. क्र. ११४
दि. ३१।३।१६ .......रोजी ठेवला असता हा ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ४६ अमृत नगर, सुंदरम नगर येथे अंतर्गत रस्ता डांबरी करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे पुर्वगणनपत्रक क्र. १४२/२०१५-१६ र.रु. २४,५०,२७४/- इतकेचे तयार केले असून, याकामी मा.म.न.पा.ची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. ३१-३-१६ चे टिपणीने आलेले प्रकरणांस मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४५ ठ. क्र. ११५
दि. ३१६१९६ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



शहर सोलापूर मुरारजी पेठ, हजरतखान चाळ घर नं. ७/३cC-१B/-२ या जागेचा ताबा घेवून जागेचा मोबदला देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव  व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे सौ. शबनम अ. शेख यांचे २०.९१ चौ. मी. जागेचे मुल्यांकन हे २०.९१ X १८८१० र.रु. ३,९३,३१७/- इतकी होत आहे. सदरची रक्कम अर्जदार यांना देणे व सदरची जागा ADTP यांचेकडून ताब्यात घेवून जागेचे ७/१२ उता-यावर मनपाचे नांव लावून घेणे योग्य होणार आहे. अर्जदार यांचे जागेचे मुल्यांकन हे ५०,०००/- पेक्षा जास्त असलेने तसेच सदरची बाब धोरणात्मक असलेने मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे प्रकरण मालमत्ता विनियोग या सदरील कलम ७९ मधील पोटकलम (क) नुसार अर्जदार यांना र.रु. ३,९३,३१७/- इतकी रक्कम अदा करणे व सौ. शबनम अ. शेख यांची २०.९१ चौ.मी. इतकी जागा म.न.पा.चे ताब्यात घेणेबाबत मा. सर्वसाधारण सभेची धोरणात्मक निर्णय होऊन मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १८-४-१६ चे टिपणीने आलेले प्रकरणांस मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका